# हिंदुत्व व भारतीय संस्कृती

हिंदुत्व आणि भारतीय संस्कृती हे शब्द ऐकले की मला स्वतःला तरी गोंधळात पडल्यासारखे होते. कारण एकीकडे महर्षी व्यास, शंकराचार्य, श्रीकृष्ण, भगवद्गीता, महाभारत, उपनिषदे, विवेकानंद अशा व्यक्ती किंवा गोष्टी डोळ्यांसमोर उभ्या राहातात. दुसरीकडे पाहिले तर, समाजात बोकाळलेला अंधश्रद्धाळूपणा व कर्मठपणा, मंदिरांतली वाढती गर्दी, आणि अभिमानाच्या नावाखाली वाढत चाललेली आत्मप्रौढी व संकुचितपणा नजरेसमोर येतो. यातली खरी भारतीय संस्कृती नक्की कोणती!?

"शतकानुशतके आपली संस्कृती आधी मुस्लीम व नंतर ब्रिटीश टाचेखाली भरडली जात होती" या सबबीखाली सर्रास जुने ते सगळेच चांगले, सर्वच परंपरांचे पुनरूज्जीवन झाले पाहिजे असा आग्रह अलीकडे दिसतो. बरेवाईट हा तोल सुटला आहे. श्रद्धाळूपणा प्रमाणाबाहेर वाढतोय, नवस/ज्योतिषशास्त्र अशा अंधश्रद्धांचे प्राबल्य वाढत चाललेय. सर्वात चिंतेची बाब अशी की सर्व समजुती व परंपरा शास्त्रावर आधारित (scientific) आहेत असे आग्रहपूर्वक सांगितले जाते. अमुक पंडिताने किंवा शास्त्रज्ञाने अभ्यास करून हे सिद्ध कसे केले आहे याचे पोकळ दाखले देखील दिले जातात! पाश्चात्त्य जे असेल ते सर्व भ्रष्ट, त्यांनी लावलेले सर्व शोध आमच्या पूर्वजांनी आधीच लावले होते, पाश्चात्त्यांनी कशी जगाची वाट लावली आहे आणि आता प्राचीन भारतीय संस्कृती हेच जगाचे एकमेव आशास्थान उरले आहे, असे भाषण हे अभिमानी करतात.

जी भारतीय संस्कृती सर्वसमावेशक होती, सर्व मतप्रवाहांचा, धर्मांचा आदर करणारी होती, ती यात कुठेच दिसत नाही. खुद्द ज्या सावरकरांनी गाय या प्राण्यामधे sacred असे काहीच नाही, असे आग्रहपूर्वक म्हटले होते, त्याच सावरकरांच्या नावाखाली आजचे नवहिंदुत्ववादी गाईला हात जरी लावला तरी इतरधर्मीयांचा खून पाडायला मागे-पुढे पाहात नाहीत. जे वैदिक तत्त्वज्ञान सूर्य, पृथ्वी, अवकाश अशा नैसर्गिक शक्तींना, एव्हढेच नव्हे वैश्विक ईश्वरास आवाहन करते, ईश्वर अनादि/अनंत आहे, निर्गुण/निराकार आहे, असे म्हणते, त्याच वैदिक तत्त्वज्ञानाच्या नावाखाली मूर्तिपूजेचे प्रस्थ, देवळांची मुजोरी, वारी/पालखी/गणपती अशा उत्सवांचे थोतांड पराकोटीला गेले आहे. पाहाल तिथे भाविकांची अमाप गर्दी दिसते. यातल्या किती जणांनी खरंच उपनिषदे वाचली आहेत, शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान समजून घ्यायचा प्रयत्न केला आहे, गीतेचा एकतरी अध्याय अभ्यासला आहे, किमान महाभारत निव्वळ कथा म्हणून ऐकताना तरी "धर्म" या विषयावर वेळोवेळी झालेले संवाद लक्ष देऊन ऐकले आहेत, संतांचा निव्वळ माणुसकीवर आधारित व्यापक दृष्टीकोन समजून घेतला आहे, याविषयी मला शंका आहे. या लोकांच्या संस्कृती-अभिमानात आमचे ते (जे असेल ते सगळे) चांगले आणि इतरांचे सगळे वाईट, कनिष्ठ, हीन एव्हढे एकच तत्व दिसते. विवेकानंदांचे परखड आत्मपरीक्षण यांना झेपत नाही. "हजार वर्षे आम्ही इतरांची अरेरावी सहन केली, आता आमचे दिवस आले आहेत" असा आक्रमक अविचार दिसतो. यांच्या विचारपद्धतीत एखादी जरी चूक दाखवून द्यायचा प्रयत्न केला तर ते तुमच्या अंगावर धावून तरी येतील किंवा "मग परदेशात असे-असे चालते त्याचे काय?" असा युक्तिवाद देतील. म्हणजे बाकी चोर आहेत म्हणून आम्ही चोरी केली तर काय चुकले! असा हा युक्तिवाद झाला! "गर्व से कहो हम हिंदू हैं" या घोषणेतला गर्वच सर्वांना समजलाय, "हिंदू" असणे म्हणजे काय याची कोणालाच काही पडलेली नाही.

मला स्वतःला भावलेली भारतीय संस्कृती अशीः माझा पिंड नास्तिकतेकडे झुकणारा असल्याने (नास्तिकतासुद्धा वैदिक संस्कृतीत मान्य आहे हे बऱ्याच जणांना माहित नसेल!) मला निराकार/निर्गुण/वैश्विक ईश्वराची संकल्पना आवडते. उपनिषदांतले सगळेच तत्त्वज्ञान पटत नसले तरी ते अभ्यासायला मला आवडते. कारण त्यात कुठेही अमुक तत्त्वाचा आग्रह नाही. गीतेत वर्णिलेले मुक्तीचे विविध मार्ग मला विलक्षण वाटतात. श्रीकृष्णास देव मानत नसलो तरी त्याचे व्यक्तिमत्त्व, त्याची जीवनपद्धती, विचारधारा हे सगळे मला अद्भुत, जगावेगळे वाटते. आपल्या ऋषिंनी सुचवलेले चार आश्रम मानवी जीवनासाठी अगदी योग्य आहेत असे मला वाटते. चांगल्या आरोग्यासाठी आयुर्वेदातील विचार व उपाय (जे आधुनिक शास्त्रीय विचारसरणीस -- the scientific method -- बगल देत नाहीत) व योगासने हे केव्हाच माझ्या जीवनपद्धतीचा भाग झाले आहेत. आपले प्राचीन साहित्य -- महाभारत, रामायण, कालिदासाची नाटके -- जगाला मिळालेली मोठी देणगी आहे. एव्हढेच काय वात्स्यायनाचे “कामसूत्र” सुद्धा अत्यंत वाचनीय आहे असे माझे मत आहे! पण मूर्तिपूजेचा अतिरेक, देवळांची झुंडशाही, "गुरू" लोकांची मुजोरी, चातुर्वर्ण्य पद्धत, अशा अनेक रोगांमुळे भारतीय संस्कृती अनेक शतके dark ages मधे होती आणि अजूनही आहे असे माझे मत आहे. या व इतर अनेक रोगांचे परखड आत्मनिरीक्षण करून आधी त्यांचा स्वीकार (म्हणजे हे रोग आपल्या संस्कृतीला खरेच झाले आहेत हे मान्य करणे) आणि त्यांच्या निर्मूलनाचा सार्वत्रिक विचार ही खरी काळाची गरज आहे. आपल्या पूर्वजांनी विविध क्षेत्रात काय कार्य केले आणि त्यातले काय बरोबर आणि काय चूक होते हा विषय विद्यापीठातल्या “इतिहास” विभागांत अभ्यासण्यास काहीच हरकत नाही. पण काहीही करून “आपले पूर्वज कसे महान होते” हे सिद्ध करण्याचा मोह टाळला पाहिजे. सर्व पृथ्वीवरची मानवजात जर एकच असेल तर बुद्धिमत्तेचा वारसा फक्त भारतीयांकडे कसा असू शकतो हा विवेक ठेवला पाहिजे. प्रत्येक माणसात गुण तसेच दोषही असतात हे शास्त्रीय सत्य असताना आपले पूर्वज केवळ सद्‌गुणांचे पुतळे, जणू स्वर्गातून पडलेले कसे असू शकतात हा विचार झाला पाहिजे.

इतिहासात भारत देशावर अन्याय झाले, बेबंद अत्याचार झाले, परधर्मीयांनी हिंदूंवर बेछूट धर्मांतर लादले हे निर्विवाद सत्य आहे. पण त्याचा सूड सध्याच्या भारतीयांवर घेणे म्हणजे परंपरागत चालू ठेवलेल्या भाऊबंदकीसारखे आहे. इतर धर्मांतले विचार हिंदू तत्त्वज्ञानापुढे काही बाबतीत मागासलेले वाटले तरी त्या धर्मांना हीन लेखण्याचा आपल्याला काय अधिकार आहे -- विशेषतः वर नमूद केलेले आपल्यांत असलेले रोग लक्षात घेता? त्यांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे -- किंबहुना सर्वच धर्मांनी तसे करण्याची या आधुनिक युगाची गरज आहे असे मला वाटते.

“हिंदूंना स्वाभिमान नाही. सगळे साले पाश्चात्यांचे लांगूलचालन करत असतात. साहेबाने कौतुक केले तरच यांना आपले बरोबर आहे हे पटते.” असा एक आरोप या नव-हिंदुत्ववाद्यांकडून केला जातो. तो काहींच्या बाबतीत खराही असेल. ही स्वाभिमानशून्यता हा एक रोगच आहे असे मी म्हणेन, आणि तो का आहे आणि कसा दूर करता येईल याचा विचार झाला पाहिजे. पण तो जबरदस्तीने, “गर्व से कहो” असा धमकीवजा आदेश देऊन बरा होणार आहे का? स्वाभिमान म्हणजे गर्व नव्हे. स्वाभिमान म्हणजे self-respect. समोरच्याने काहीही शिवीगाळ केली तरी स्वतःच्या तत्त्वांविषयी, जीवनपद्धतीविषयी विश्वास बाळगून राहाणे. “मी सगळयात भारी” असे म्हणणे नव्हे! सध्याच्या आक्रमक हिंदू धर्मगुरूंना पाहिल्यावर तरूण पिढी हिंदुत्वाकडे आकर्षित होण्याऐवजी दूर पळण्याची शक्यताच जास्त आहे! केवळ गुंड लोक अशा आक्रमकतेकडे ओढले जातात -- पूर्णपणे वेगळ्या कारणांसाठी! मग

विरोधकांना धमक्या आणि गुंडगिरी या मार्गांनी नेस्तनाबुत करण्याचे प्रकार -- जे आज भारतात सर्वत्र दिसतात -- ते सुरू होतात.

"इतर लोक धर्मप्रसार करतात आणि त्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढतेय. पण हिंदुधर्मात धर्मप्रसार हा प्रकार नसल्याने आपली संख्या दिवसेंदिवस कमी होतेय. एक दिवस भारताचा पाकिस्तान होणार!" अशी एक भीती नवहिंदुत्ववादी व्यक्त करतात. खरे तर माझ्यासारख्या नास्तिक माणसाला कमी-जास्त प्रमाणात सर्वच धर्म जुनाट व अंधश्रद्धांनी पछाडलेले वाटतात. आधुनिक युगात computers, automation, robots यांचे वाढते प्राबल्य पाहाता हे जुने धर्म किती काळ टिकतील अशीही शंका वाटते. आणि टिकले तरी एकच धर्म इतर सर्वांच्यावर कुरघोडी करून बसेल हे कितपत संभाव्य आहे? हिंदू धर्म नामशेष किंवा अल्पसंख्याक होण्याआधी लोकसंखेच्या बोज्याखाली किंवा पर्यावरणबदल, आण्विक युद्ध अशा इतर कारणांमुळे पृथ्वीच आधी नामशेष होईल की काय असे वाटते.

चिन्मय मिशन, वेदांत सोसायटी यासारख्या संस्थांनी आपली प्राचीन संस्कृती व तत्त्वज्ञान जपले, इच्छुक लोकांना त्याचे शिक्षण उपलब्ध करून दिले, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कालबाह्य झालेल्या आणि शास्त्रविरोधी जुन्या रूढी/समज यांना फाटा देत व शास्त्रीय (scientific) दृष्टीकोन जागा ठेवत हिंदू धर्माचे रूप dynamic ठेवले तर हिंदू धर्माला काहीही धोका नाही असे माझे मत आहे. भारतीय संस्कृतीच्या अस्सल मौलिक देणग्या -- उदा. शास्त्रीय संगीत, भारतीय पाकशास्त्र, योगासने, प्राणायाम, आयुर्वेद, इ. -- जगभर रूजल्या आहेत आणि त्या अमर राहतील -- काहीही प्रचार न करता.

धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म -- हे सर्व किती जीवनावश्यक आहेत आणि किती सर्वांनी अभ्यासले पाहिजेत हे व असे प्रश्न सामाजिक नसून वैयक्तिक आहेत असे मला वाटते. (प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ रिचर्ड फाईनमन -- हो! एक गोरा साहेब! -- याने म्हटल्याप्रमाणे व्यक्तीचा धर्म तिच्या जन्मावर आधारित न ठेवता त्या व्यक्तीला २१ वर्षे वय झाल्यानंतर निवडण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे!) या प्रश्नांत राज्यकर्त्यांनी पडणे तर अजिबात चुकीचे आणि धोक्याचे आहे. या प्रश्नांविषयी इच्छुकांना मार्गदर्शन करणे रामकृष्ण मिशन, चिन्मय मिशन यासारख्या संस्थांचे काम आहे. (अर्थात या संस्थांनीही वर म्हटल्याप्रमाणे "आम्ही हिंदू म्हंजे लई भारी" अशी भूमिका न घेता विवेकाने, आपल्या संस्कृतीतले सर्व गुणदोष स्वीकारून, लोकांचे शिक्षण केले पाहिजे.) समाजसुधारकांनी अंधश्रद्धा, जातिभेद यासारख्या भयाण रोगांचा पाठपुरावा करण्यात सर्व शक्ती पणाला लावली पाहिजे.

ज्या समाजातले बहुतांशी बुद्धिजीवी व बुद्धिमान लोक इतिहासाचा कीस काढत न बसता सद्यस्थिती व भविष्य यांच्या विचारात गर्क असतात तोच समाज प्रगतीशील राहू शकतो.

लेखक: अभय जोशी (abjoshi@yahoo.com)
Last updated: 23 July 2022